# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

## दिनांकः29.03.2024 वारःशुक्रवार

१. लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना जारी
२. महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यातल्या ११० उमेदवारांचे अर्ज ठरले वैध
३. अरुणाचल प्रदेश भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहील - परराष्ट्र मंत्रालयाचा पुनरोच्चार
४. गुड फ्राय डे निमित्त आज देशभरातील चर्चमध्ये विशेष प्रार्थनेचं आयोजन
आणि
५. मायामी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा रोहन बोपण्णा आणि ऑस्ट्रेलियाचा मॅथ्यू ऍबडेन पुरुष दुहेरीच्या अंतिम फेरीत दाखल

**निवडणूक**
लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीची अधिसूचना काल जारी करण्यात आली. या टप्प्यात १२ राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या ८८ जागांसाठी २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. यासाठी ४ एप्रिलपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. जम्मू काश्मीर वगळता इतरत्र ५ एप्रिलला त्यांची छाननी होईल. जम्मू काश्मीरमध्ये ६ तारखेला उमेदवारी अर्जांची छाननी होईल.
दुसऱ्या टप्प्यात केरळमधल्या २२, कर्नाटक १४, राजस्थान १३, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रातल्या प्रत्येकी ८, मध्य प्रदेश ७, आसाम आणि बिहारमधल्या प्रत्येकी ५, पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमल्या प्रत्येकी तीन तसंच मणिपूर, त्रिपुरा, जम्मू काश्मीरमधल्या प्रत्येकी एका जागेसाठी मतदान होणार आहे.

**छाननी**
लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील उमेदवारी अर्जाची काल छाननी झाली. यात राज्यातील पाच मतदारसंघातल्या 181पैकी 110 उमेदवारांचे अर्ज, वैध ठरले आहेत. राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं ही माहिती दिली. पहिल्या टप्प्यातील पाच मतदारसंघात उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत उद्या म्हणजे 30 मार्चपर्यंत असून या मतदारसंघासाठी 19 एप्रिल रोजी मतदान होईल.

**शिंदे गट उमेदवार**
महाराष्ट्रात शिवसेनेनं ८ उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. त्यात ७ विद्यमान खासदारांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. दक्षिण मध्य मुंबईतून राहुल शेवाळे, कोल्हापुरातून संजय मंडलिक, शिर्डीतून सदाशिव लोखंडे, बुलडाण्यातून प्रतापराव जाधव, हिंगोलीतून हेमंत पाटील, मावळमधून श्रीरंग बारणे आणि हातकणंगले इथून धैर्यशील माने या विद्यमान खासदारांना एकनाथ शिंदे यांनी पुन्हा उमेदवारी दिली आहे. रामटेकमध्ये राजू पारवे यांची उमेदवारी आधीच जाहीर झाली असून त्यांनी अर्जही दाखल केला आहे.
दरम्यान हिंदी चित्रपट सृष्टीतले अभिनेता आणि माजी खासदार गोविंदा यांनी काल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

**राष्ट्रपती**
पायाभूत सुविधा प्रकल्प आणि त्यांचं बांधकाम पर्यावरणपूरक आणि उर्जाबचत करणारं असायला हवं असं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. केंद्रिय सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहायक कार्यकारी अभियंत्यांच्या बैठकीत त्या काल नवी दिल्लीत बोलत होत्या. इमारती, रस्ते आणि इतर पायाभूत सुविधा प्रकल्पांमधे अभियंत्यांनी नाविन्यपूर्ण कल्पनांचा वापर केला पाहिजे. यामुळे त्यांना नवनव्या आव्हानांचा परिणामकारकरित्या सामना करता येईल असं राष्ट्रपती यावेळी म्हणाल्या.

**परराष्ट्रमंत्रालय**
अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहील असं परराष्ट्र मंत्रालयानं पुन्हा एकदा ठणकावून सांगितलं आहे. अरुणाचल प्रदेशाबाबत भारताची भूमिका अत्यंत स्पष्टपणे अनेक वेळा मांडण्यात आली आहे. चीननं कितीही वेळा निरर्थक दावे केले तरी भारताची भूमिका कधीच बदलणार नाही असं परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी काल माध्यमांना सांगितलं.
रशियानं सैन्यात भरती करुन घेतलेल्या भारतीय नागरिकांची शक्य तितक्या लवकर सुटका करुन भारतात परत आणण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत असं जयस्वाल यांनी अन्य एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं.

**<u>गुड फ्रायडे</u>**

आज प्रभू येशू ख्रिस्तांच्या बलिदानाचा दिवस म्हणजेच गुड फ्रायडे आहे. इस्टर संडेच्या आधी येणारा शुक्रवार गुड फ्रायडे असतो. यानिमित्त देशभरात विविध उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे तसंच चर्चमध्ये प्रार्थनासभांचं आयोजन करण्यात आलं आहे.
हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण विविध भारतीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.

**<u>ICJ-GAZA-</u>**

गाझामधील पॅलेस्टिनी नागरिकांसाठी अन्नाची मुलभूत गरज भागवण्यासाठी इस्राईलनं तातडीनं आणि परिणामकारक पावलं उचलावीत तसंच अन्नधान्य वाहतूक व्यवस्था सुरळीत होईल, याबाबत खात्री करावी. असे निर्देश आंतरराष्ट्रीय न्यायालयानं दिले आहेत. गाझामध्ये जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा भासत असल्यानं इथल्या नागरिकांची उपासमारीची समस्या तीव्र होत असल्याबद्दल न्यायालयानं चिंता व्यक्त केली आहे.

**<u>अफगाणिस्तान</u>**

अफगाणिस्तानमध्ये आज पहाटे 4 पुर्णांक 6 रिख्टर तीव्रतेच्या भूकंपाचे धक्के बसले. राष्ट्रीय भुगर्भशास्त्र विभागानं दिलेल्या माहितीनूसार पहाटे 5 वाजून 11 मिनिटांनी जमिनीपासून 110 किलोमीटर खाली भूकंपाचा केंद्रबिंदू होता. कालही अफगाणिस्तानमध्ये 4 पुर्णांक 2 रिख्टर तीव्रतेचे धक्के जाणवले होते.

**<u>रशिया</u>**

उत्तर कोरियाच्या अण्वस्त्र कार्यक्रमामुळे संयुक्त राष्ट्रांनी त्या देशावर लादलेल्या निर्बंधांविरोधात रशियानं आपल्या नकाराधिकाराचा वापर केला आहे. रशिया उत्तर कोरियाकडून युक्रेनविरोधातल्या युद्धासाठी शस्त्रास्त्रं खरेदी करत असल्यामुळे त्या देशाची पाठराखण करत आहे असा आरोप पश्चिमी देशांनी केला आहे. दरम्यान, सुरक्षा समितीतल्या १५ सदस्य देशांपैकी १३ देशांनी उत्तर कोरियावरील निर्बंधांच्या बाजूनं मत दिल्यामुळे रशियाच्या नकाराधिकारामुळे निर्बंधांवर काहीही परिणाम होणार नाही. मात्र आताच्या निर्बंधांची मुदत एप्रिलअखेर संपत आहे आणि रशियाच्या नकाराधिकारामुळे निर्बंधांना काही काळासाठी खीळ बसू शकते.

**<u>पॅलेस्टाइन</u>**

पॅलेस्टाइनमधे नवीन सरकार स्थापन करण्याला राष्ट्राध्यक्ष महमूद अब्बास यांनी मंजूरी दिली आहे. नव्या सरकारचं नेतृत्व पंतप्रधान मोहम्मद मुस्तफा करतील. मुस्तफा यांनी सरकारचा कृती आराखडा आणि प्रस्तावित कामांची यादी राष्ट्राध्यक्षांकडे सादर केली असून त्यालाही मंजूरी मिळाली आहे. सर्वप्रथम गाझा भागातल्या युद्धबंदीला आणि इस्रायली सैन्याच्या संपूर्ण माघारीला सरकारचं प्राधान्य असेल असं पंतप्रधान मुस्तफा यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीत सांगितल्याचं वृत्त वाफा या तिथल्या अधिकृत वृत्तसंस्थेनं दिलं आहे.

**<u>एनआयएअटक</u>**

बेंगळुरूतल्या रामेश्वरम कॅफेमध्ये झालेल्या स्फोटाच्या मुख्य सूत्रधाराला काल राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयए नं अटक केली. एनआयए नं कर्नाटक, तमिळनाडू आणि उत्तर प्रदेशात मोठ्या प्रमाणात धाडी टाकल्यानंतर त्याला अटक करण्यात आली. पकडण्यात आलेल्या या सूत्रधारानं इतर दोन आरोपींना स्फोट घडवण्यात महत्त्वाची मदत केली होती असं चौकशीत आढळून आलं आहे.

**<u>मुख्तार अन्सारी</u>**

उत्तर प्रदेशातील बांदा इथल्या तुरुंगात अटकेत असलेल्या मुख्तार अन्सारीचा काल रात्री बांदा वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. बांदा तुरुंगातच तब्येत बिघडल्यानंतर त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. दरम्यान मुख्तार अन्सारीच्या मृत्यूनंतर उत्तर प्रदेशात कलम 144 लागू करण्यात आलं आहे.

**<u>केजरीवाल</u>**

मद्यधोरण गैरव्यवहार प्रकरणी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या सक्तवसुली संचालनालयाच्या कोठडीत दिल्ली न्यायालयानं 1 एप्रिलपर्यंत वाढ करण्याचा निर्णय काल दिला. केजरीवालांची सक्तवसुली संचालनालयाची यापुर्वी सुनावण्यात आलेली कोठडीची मुदत काल संपली. त्यावरील सुनावणीदरम्यान विशेष न्यायधीश कोवेरी बवेजा यांनी हा निर्णय दिला. दरम्यान, त्यांना आंतरिम जामिन देण्यास न्यायालयानं नकार दिला. मात्र केजरीवालांच्या अटकेविरोधात दाखल याचिकेसंदर्भात न्यायालयानं नोटीस बजावली आहे.

**<u>माद्रिद-स्पेन-मार्स्टर्स-बॅडमिंटन</u>**

माद्रिद स्पेन मार्स्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी व्ही सिंधूनं महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. काल झालेल्या उपउपांत्यपूर्व सामन्यात तिनं तैवानच्या वाय हुआंग हिच्यावर 21-14, 21-12 अशा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. उपांत्यपूर्व सामन्यात तिचा सामना थायलंडच्या सुपनीडा केटथाँग हिच्याशी होईल. पुरुष दुहेरीत ध्रुव कपिला आणि एम. आर. अर्जुन या भारतीय जोडीनं उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

महिला दुहेरीत अश्विनी पोनप्पा आणि तनिशा क्रॅस्टो यांनी ऑस्ट्रेलियाच्या टिफॅनी हो आणि ग्रॅन्या सोमनविले यांचा 21-14, 21-8 असा पराभव केला. तर मिश्र दुहेरीत एन सिक्की रेड्डी आणि बी सुमित रेड्डी यांनी अमेरिकेच्या एलिसन ली आणि प्रेसली स्मिथ यांना 22-20, 21-18 असं पराभूत केलं.

**<u>मायामी-खुल्या-टेनिस-स्पर्धा</u>**

फ्लोरीडामध्ये सुरु असलेल्या मायामी खुल्या टेनिस स्पर्धेत भारताचा रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन सहकारी मॅथ्यू ऍबडेन पुरुष दुहेरीचा अंतिम फेरीत पोहोचले आहेत. त्यांनी उपांत्य फेरीच्या सामन्यात स्पेनचा मार्सेल ग्रॅनोलर्स आणि अर्जेंटिनाच्या होरासीओ झेबॅलोस या जोडीचा 6-1, 6-4 असा पराभव केला. उद्या होणाऱ्या अंतिम सामन्यात भारत-ऑस्ट्रेलियन जोडीचा सामना अमेरिकेच्या ऑस्टिन क्राजिसेक आणि क्रोएशियाच्या इव्हान डोडिग या दुसऱ्या मानांकित जोडीशी होणार आहे. उपांत्य फेरीतील या विजयामुळे बोपण्णा पुरुष दुहेरीच्या क्रमवारीतील अव्वल स्थान पुन्हा मिळवण्यात यशस्वी होणार आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.